Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9| September 2025

Original Article

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक योगदान

**वैशाली हिरालाल गोतमारे[1], डॉ.गिरीश सपाटे[2]**
[1]संशोधक विद्यार्थी, पी. जी. डी. टी. मराठी रा. तु. म. नागपुर विद्यापीठ
[2]प्राध्यापक व मराठी प्रमुख विद्यासागर कला महाविद्यालय, खैरी(बिजेवाडा), रामटेक
राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचे सामाजिक योगदान
**Email-** rautvaishali87@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170939
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9
Pp. 213-215
September 2025
**Submitted:** 22 Aug.2025
**Revised:** 2 Sept. 2025
**Accepted:** 21 Sept.2025
**Published:** 30 Sept. 2025

***सारांश***

*वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्म अमरावती तालुक्यातील यावली या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव मंजुळा व वडिलांचे नाव बंडूजी घरी १८ विश्वे दारिद्र्य महाराजांचे जन्माची वेळी एवढं वादळ झालं की घरावरचे छप्पर देखील उडून गेले महाराजांचे जन्मनाव माणिक. महाराजांचा जन्म वरखेडवासी विदेही संत अडकुजी महाराज यांच्या कृपाप्रसादाने झाला म्हणून आई-वडिलांनी त्यांना त्यांच्या पायावर घातले त्यांच्याबरोबरच बाल मणिक पुढे तुकडे खाऊ लागला आणि पुढे माणिकचा तुकड्या झाला.*

*बालपणी महाराज द्वाड होते शाळेपेक्षा त्यांचा ओढा शिवालयाकडे होता अभ्यासाऐवजी एकतारी व खंजिरीवर भजने म्हणण्यात त्यांचा वेळ जाई. त्यासाठी त्यांना वडिलांकडून प्रसाद मिळे एवढेच नव्हे तर कधी कधी त्यांच्या द्वाडपणाची शिक्षा त्यांचे आईसही मिळे' मग मात्र त्यांच्या मनात कालवा कालव होई बापाचा धंदा शिंप्याचा होता मग ते मुकाटपणे काही दिवस बापाला मदत करू लागले' परंतु वैराग्य भावना व ईश्वर दर्शनाची तळमळ त्यांना स्वस्थ बसू देईना यातच 1921 साली त्यांचे गुरु आडकोजी महाराज समाधीस्थ झाल्यामुळे त्यांच्यावर फार मोठा आघात झाला ते पुढे पंढरीस गेले. घरी परत आले खरे परंतु मन रमेना म्हणून 1923 साली त्यांनी रामटेक च्या जंगलाचा रस्ता धरला व पुढे फिरत फिरत चिमूरकडील जंगलात गेले तिथे ते देवबाबा या नावाने ओळखले जाऊ लागले.*

*इसवी सन 1925 मधे त्यांना विदर्भात आणण्यात आले. त्यांनी मग देशभर दौरा केला. समाजाच जवळून निरीक्षण केले. त्यानंतर त्यांनी सालबर्डी व मोझरी येथे यज्ञ घडून आणले. सत्याग्रह शिबिरातून भजनी म्हटली. 1936 मध्ये त्यांना महात्मा गांधी यांनी आपल्या आश्रमात महिनाभर ठेवून घेतले. त्यांनी आरती मंडळाची स्थापना केली. पुढे सेवा मंडळात त्याचे परिवर्तन झाले. सेवा मंडळाद्वारे त्यांनी गावोगावी प्रार्थना ,व्यायाम, शिबिरे, चरखा, मंडळ महिलोन्नती यासारखे प्रभावी कार्य केले.*

***मुख्य शब्द;***-*राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,सामाजिक योगदान,स्वातंत्र्य संग्राम,सेवा मंडळ,ग्रामगीता,व्यसनमुक्ती,राष्ट्रीय एकात्मता,मानवता,ग्राम सुधारणा,महिलांचे सबलीकरण,शिक्षण,शेतकरी व शेती,कुटुंब नियोजन,भजनी चळवळ*

1942 चे स्वातंत्र्य आंदोलन सुरू झाले .महाराजांच्या मुखातून बोल बाहेर पडले, 'काहे को धूम मचाते हो, दुखवाकर भारत सारे आते है नाथ हमारे!',

पत्थर सारे! बॉम्ब बनेंगे भक्त बनेगी सेना बन्सी का बजाना छोड दे -बंन चक्र सुदर्शनधारी 'त्यांच्या मुखातून ही भजने बाहेर पडली आणि त्यांची कर्मभूमी म्हणून गाजलेली आष्टी, चिमूर, यावली ही गावे स्वातंत्र्य युद्धात अमर झालीत.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.17473385
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*वैशाली हिरालाल गोतमारे,संशोधक विद्यार्थी, पी. जी. डी. टी. मराठी रा. तु. म. नागपुर विद्यापीठ*

**How to cite this article:**
*गोतमारे, . वैशाली. हिरालाल ., & सपाटे, . गिरीश . (2025). राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक योगदान. Journal of Research and Development, 17(9), 213–215. https://doi.org/10.5281/zenodo.17473385*

मराठीच्या लढ्याबद्दल महाराजांना चांदा येथील चातुर्मास्य सप्ताहातून इंग्रजांनी पकडून आणले व रायपूर व नागपूर तुरुंगात बंद केले. त्यांच्या क्रांतिकारक भजनांवर सरकारने बंदी घातली. महाराजांनी तुरुंगातून बाहेर आल्यावर विश्वशांती नाम सप्ताह घेऊन हवालदिल झालेल्या देशवासियांना पुन्हा नवा हुरुप दिला. अमरावती येथून 'श्री गुरुदेव' मासिक काढले देशभर दौरा केला. जनजागरणासाठी रात्रंदिवस प्रवास केला. लाखो लोकांसमोर भजने व भाषणे केली  देशाला स्वातंत्र्य मिळाले. या स्वातंत्र्यसंग्रामात वंदनीय महाराजांचा सिंहाचा वाटा होता. त्यांची कीर्ती राष्ट्रपती पर्यंत केव्हाच पोचली होती. आईचेच काय ,आपण गाईचे दूध न मिळालेला तुकड्या राष्ट्रपती बरोबर राजभवनात जेवला. विनोबांबरोबर भूदान चळवळ मधे सामील झाले. स्वराज्य आले आता सुराज्य व्हावे म्हणून नवीन भजने खंजिरीवर घडू लागली.

'वाजला रे डंका -घेऊ नको शंका,
सुधरायला गाव सारे लोक लागले'

असा विश्वास देऊ लागला .धर्म- कर्म,देव कोण ,साधू कोण, गरीब -श्रीमंत कोण ,तरुण कोण व त्यांचे कार्य काय याची माहिती भजनाद्वारे तो देऊ लागला.

परंतु एवढ्यावरच त्यांचे समाधान झाले नाही.मानव मात्राचे प्रथम माहेर,आपले गाव त्यातील घर, यातून प्रगती करत सुंदर ,पुढे जावे विश्वाच्या "असा निर्धार करून त्यांनी प्रथम ग्राम सुधारण्याचे आवाहन केले. त्यासाठी त्यांनी ग्रामगीता हा प्रचंड ग्रंथ निर्माण केला.त्यात ते म्हणतात,

"ईश्वरी व्यापली हे विश्व म्हणूनही जगाची आम्हा देव,
विश्वाचा मूळ घटक गाव, ग्रामगीता त्यासाठी.
यात ग्रामचा जयजयकार, सर्व तीर्थक्षेत्रांची माहेर,
ग्राम हा विश्वाचा पाया सुंदर, ग्राम नसता प्रलयची."

त्यांच्या वरील ओव्या वरून त्याचा देव कोणता, त्यांचे तीर्थक्षेत्र कोणते, हे स्पष्टपणे कळून येते.

महाराज संत होते म्हणजे ते गंध, टिळा, माळा, भगवी वस्त्रे, घालणारे होते असे नव्हे. त्यांचा वेश साधा असे. त्यांच्या समुदायिक प्रार्थनेत कोणतेही देवाची प्रतिमा नसे. एक शुभ्र आसन आणि जवळ नंदादीप प्रत्येकाने आपापल्या मनाप्रमाणे आपली आराध्य देवता बसवावी-

'सबके लिए खुला है, मंदिर यह हमारा.
'सबके लिए खुला है,मंदिर यह हमारा.
मतभेद को भुला है, मंदिर यह हमारा.
आओ कोई भी पंथी- आओ कोई भी धर्मी ,
देशी विदेशी यो को मंदिर हमारा."

अशी विश्वव्यापक धर्माची त्यांची कल्पना. त्यांच्या देव कोणता? पूजा कोणती ?"जाणावे ग्राम हेचि मंदिर कामातील जन सर्वेश्वर ,सेवा हिची पूजा समग्र- हाची विचार निवेदावा."

**भेदाभेद व अस्पृश्यता**

याविषयी त्यांना फार चिड होती त्यासंबंधी त्यांनी केवळ कवनेच केला नाही तर प्रत्यक्ष ती निवारण्यासाठी गावोगाव प्रचार केला ते म्हणतात दूर गये हरिजन को अपने गले लगा लो रे अपने पास बिठालो रे अमोत्सव एकही थे पहले सेवा खातीर रहे केले इन बातो को भूलके अपने भूल सुधारिरे.

**व्यसन**

महाराजांना व्यसनाची फार चिड होती व्यसनामुळे देश कसा कंगाल झाला याची मोठे सुंदर शब्दचित्र त्यांनी रेखाटले आहे ते म्हणतात हे मानव सून ले बात व्यसन को छोड दे सारे, शराब गांजा पीकर किसने जीवन सफल बनाये, खाकिया तन को और धन को आखिर दुर्गती पाया रे दारूच्या व्यसनासाठी त्यांनी एक स्वतंत्र भजनच लिहिले आहे ते म्हणतात वाह रे दारूची नशा हालिद अवदशा हुशारी गेली कंगाल झाला देश गुलामी आली.महाराज शेतकरी असले तरी त्यांना शेतीची व पर्यायाने भारताची दुर्दशा पहावे ना म्हणून ते म्हणतात अशुद्ध शेतावरी पिके ना सुंदर फल रे गड्या शुद्ध कर भूतका तर बापुड्या वर घेऊन पिके बुडबुले शेत कसे त्या अरे आता का देशी कर्मनावरे वाढविले शेतात वृक्ष बहु काम जयाचे नसे उडविले पैसे खाली खिसे ते म्हणतात खेती मे नाज उगाव रे भाई खेती मे ध्यान लगाव भारत मे इतनी जनता है कोण तरी कीजिए एकही साधन हे किती का अरे बोल नाज गाव उस पर ही है शान देश की नाना रंग उडाओ तुकड्या दास कहे बोलोगे तब भुके मर जाओ रे अधिक धान्य पिकवा या मोहिमेची ही मार्गदर्शक तत्वेच आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9| September 2025

**कुटुंब नियोजन**
शिक्षण घेतले तरी आदर्श शेती केली परंतु खाणारी तोंडली वाढली तर त्यामुळेच महाराज म्हणतात बच्चो पे बच्चे हर साल होते गई, बच्चो की माता खाने पीने का और नही है रोता है, भाग्यविधाता एकेकाळी जनसंख्येला कृषी धान्य होती पुरती लाखोंनी वाढली, मती कितीतरी नातीपाती रमजीवी तर अतिच कमती बेकारीचा पाश गळा बसला.

**राष्ट्रीय एकात्मता**
महाराजांची प्रतिभा सर्व स्पर्श होती त्यांनी हाताला नाही असा एकही विषय नाही असे असले तरी त्यांनी राष्ट्रीय एकात्मतेसाठी व मानवतेसाठी आमरण प्रयत्न केले त्यांच्या प्रत्येक भजनात या दोन्ही गोष्टी प्रकर्षाने आढळतात आता हीच भजनी पहा कविता, भेद असा का सगळा बोलला भारत, दाटूनी गळा सर्वची माझे भावंडे, ही परस्परांच्या कामे सगळी मग का समजून दुखविता, महाराजांचे पवित्र स्वप्न म्हणजे मानवता राष्ट्रीयत्व म्हणजे पर धर्माचा द्वेष नको हे त्यांनी सांगितले कारण सर्व भूतो समानतो म्हणजेच खरी मानवता तोच खरा विश्वधर्म कारण किती पंथ भिन्न झाले येण्याची राष्ट्र नाचले याची त्यांना जाणीव होती म्हणून हा मिटव आता गलब बळा अशी हाक दिली आणि शेवटी आतृतीन प्रार्थना केली की

या भारतात बंधुभाव नित्य वसु दे
दे वरची असा दे
नांदोत सुखे गरीब अमिर एक मतांनी
मग हिंदू असो ख्रिश्चनवा हो ईसलामी स्वातंत्र्य सुखा या
सकला माजी वसु दे, दे वरची असा दे

**मानवता**
आज जगात स्पर्धेचे वातावरण आहे.कोण कुणाला खाली उडेल याचा नेम राहिला नाही. विश्वास उरला नाही यावेळी एक जग एक राष्ट्र ही कल्पनाच नष्ट झाली आहे. महाराजांचे मन यामुळे दुःखी झाले नाही तर नवल. हे जग एक व्हावे त्यांचा दृष्टपणा नष्ट व्हावा यासाठी त्यांनी ज्ञानेश्वर महाराजांच्या पसायदान प्रमाणे प्रार्थना केली की
जगाचा भेद लयाला जावो शांती अखंडित राहो खळनिंध का हे निर्मळ होऊ नये द्वेषपणाचा लेखन राहून वंदनीय महाराजांनी राष्ट्रासाठी जे जे करायचे होते ते सर्व काही केले केवळ शब्दाने सांगून नव्हे आधी केले मग सांगितले अशी त्यांची वृत्ती होती सेवा मंडळाद्वारे त्यांनी लाखो स्वयंसेवक तयार केले त्यांना व्यसनमुक्त केले. शारीरिक शिक्षण दिले महिलांचे वर्ग घेऊन त्यांना स्वयंपूर्ण केले. कधी मुलांना शिक्षण दिले तर गावोगाव चरखे हात गाणी चालविले विश्वबंधुताची कल्पना दिली.

असा हा थोर समाज सुधारक अनेकांचा जीवन जाता राष्ट्राचा थोर उदघाता दिनांक 11 ऑक्टोंबर 1968 रोजी दुपारी चार वाजून 58 वाजता मोझरी येथे ब्रह्म स्वरूपात विलीन झाला.

**निष्कर्ष**:
अशाप्रकारे महाराजांनी आपुल्या साहित्यातून व कार्याने सामाजिक योगदान दिले.

**संदर्भ:**

1. प्रमोद मुनघाटे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्य सुगंध
2. डॉ अक्षयकुमार काळे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्ति आणि वाङ्मय
3. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची 'ग्रामगीता, श्रीगुरूदेव प्रकाशन गुरूकुंज आश्रम मोझरी १९९२
4. डॉ शामराव कोरेटी राष्ट्रसंतांची जनजागृती चळवळ
5. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,सुधा-चसंधू, श्रीगुरूदेव प्रकाशन, गुरूकुंज आश्रम अमरावती